<u>नियमीत दिवाणी दरखास्त क्र. २/२०१८ नि.४८ खालील आदेश</u>

अर्जदार/वादी यांनी सदरची दरखास्त वि.प. यांचे विरुध्द रे.क.नं.११/२०१० चे कामी झालेल्या तडजोड हुकुमनाम्यातील ठरलेप्रमाणे विशिष्ठ बाजूची मिळकत खुली करणेबाबत वि.प यांनी निर्माण केलेला अडथळा दूर करणेसाठी सदरची दरखास्त दाखल केली आहे.

०२. तडजोड हुकुमनाम्यानुसार वि.प. करत असले घराचे बांधकाम जे पूर्ण झाले आहे. वि.प.यांचे घराच्या दक्षिणेकडील भिंतीपासून ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक संडास पर्यंत जे सध्या पडलेल्या स्वरुपात आहे यामधील रिकाम्या जागेत दरखास्तदार व वि.प. यांनी कोणत्याही प्रकारे कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण होईल अशा प्रकारचे कृत्य अथवा कोणत्याही प्रकारे बांधकाम करणेचे नाही. सदरची खुली जागा कायमपणे खुली ठेवनेची आहे असे ठरले होते व आहे. ठरल्याप्रमाणे कोर्टाचा हुकुमनामा झालेला असताना सुध्दा वि.प. यांचे मार्फत त्यांचा भंग केला असलेने अर्जदार/दरखास्तदार यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०३. दरखास्तदार व यांचे दरम्यान ज्या जागेबाबत पूर्वी तडजोड होऊन रे.क.नं. ११/२०१० मधील वाद संपुष्टात आला आहे ती जागा, मिळकत सदर दरखास्तीचा व सदर अर्जाचा मुख्य विषय असून सदर जागा व मिळकत म्हणजेच वि.प. करत असले घराचे बांधकाम आजरोजी पूर्ण झाले आहे. वि.प. यांचे घराच्या दक्षिणेकडील भिंतीपासून ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक संडास पर्यंत जे सध्या पडलेल्या स्वरुपात आहे यामधील रिकामी जागा ज्याचे पूर्व बाजूस कळे म्हासुर्ली रस्ता व पश्चिम बाजूस दरखास्तदार यांची गट क्रं. ६९६ ची शेत मिळकत होय. त्यामुळे सदर जागेचे कोर्ट कमिशन होणेकरीता सदर अर्ज दाखल केला आहे. वर नमुद मिळकतीमध्ये कुंपण करुन हरकत अडथळा केला असलेने सदरची वस्तुस्थिती रेकॉर्डवर येणेसाठी कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. कोर्ट कमिशन यांची नेमणूक झालेस दरखास्तदार व वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणा नाही. सदर दरखास्त गुणदोषावर निर्गत होणेस मदत होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०४. वि.प./प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं. ५१ वर दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, दरखास्तदार यांनी दाखल केलेला सदरचा अर्ज हा चुकीचा व बेकायदेशीर व कायदयातील तरतुदीविरुध्द असा आहे. त्यामुळे सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही. रे.क.नं. ११/२०१० मधील हुकुमनामा चे अवलोकन केले असता दावा दावा कायम मनाईकरीता दाखल केलेचे

दिसून येते. तसेच सदर दावा मिळकतीचे वर्णन म्हणून मौजे सावर्डे तर्फे असंडोली, ता.पन्हाळा येथील भू.गट. क्रं. ६९६ ज्याचे एकूण क्षेत्र हे.०.२७ आर बाबत दाखल केला असलेचे दिसून येते. तसेच सदर वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान झालेली तडजोड पुरसीस ही देखील दावा मिळकतीचे अनुषंगाने झालेली आहे.

**०५.** सदर कामी दरखास्तदार यांनी नि.क्रं.९ ला कोर्ट कमिशनर यांचे नेमणूकीकरिता अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज नामंजूर केला आहे. त्यानंतर दरखास्तदार यांनी नि.क्रं.१७ ला पुन्हा कोर्ट कमिशनर नेमणूकीबाबत अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज मे. न्यायालयाने मंजूर केला आहे. सदर आदेशा प्रमाणे कोर्ट कमिशनर होऊन त्यांचा अहवाल नि.क्रं. २७ वर दाखल केला आहे. सदर अहवालचे अवलोकन करता दरखास्तदार तर्फे हजर असले पंचानी कोर्ट कमिशनर मधील वादाकिंत मिळकत गायरान भू.गट क्रं. ६ ची मिळकत असलेची माहिती दिली आहे. नि.क्रं. १७ वरील आदेशानुसार दावा मिळकत म्हणजेच भू.गट क्रं. ६९६ ची पाहणी केली असता त्यामध्ये वि.प. यांनी हरकत अडथळा अथवा कुंपण घातले असलेचे कोठेही नमूद केलेले नाही. त्यामुळे वि.प.यांनी दरखास्तदार यांना रे.क.नं. ११/२०१० चे हुकुमनामेचा भंग केला असलेच व दरखास्तदार यांना हरकत अडथळा केला असलेची बाब पुराव्यानिशी शाबित करु शकलेले नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही.

**०६.** दरखास्तदार यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज हा केवळ कामाची चौकशी लांबवणेचे उद्देशाने व वि.प. यांना आर्थिक नुकसान पोहचवून मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल केला असलेने सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती वि.प. यांनी केली आहे.

**०७.** दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. दरखास्तीचे अवलोकन करता नि.क्रं. १७ वर पारित केलेल्या आदेशा प्रमाणे मौजे सावर्डे तर्फ असंडोली येथील भूमापन गट क्रं. ६९६ एकूण क्षेत्र २७ आर या मिळकतीची पाहणी करुन तसा अहवाल दाखल करणेबाबत आदेशीत केले होते. परंतु नि.क्रं. २७ वरील कमिशनर यांच्या अहवालाचे अवलोकन करता वादी व प्रतिवादी यांनी रे.क.नं. ११/२०१० मध्ये तडजोडी प्रमाणे गट नं. ६९६ एकूण क्षेत्र २७ आर या मिळकतीची व गट नं. ६९६ च्या उत्तरेस गायरान मिळकत गट नं. ६ ची पाहणी करुन त्याप्रमाणे नकाशा व वस्तुस्थितीचा अहवाल न्यायालयासमोर येणे आवश्यक होते. परंतु सदर अहवलाप्रमाणे दावा मिळकतीचा कुठेच बोध होत नाही. त्यामुळे दरखास्तदार यांचा सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश

## <u>आदेश.</u>

०१. सदरचा अर्ज मंजूर करणेत आला आहे.

०२ न्यायालयीन आयुक्त म्हणून विधिज्ञ श्री. बी.एस.पाटील यांची नेमणूक करण्यात येते. त्यांनी मौजे सावर्डे तर्फ असंडोली, ता.पन्हाळा येथील भूमापन गट क्रं. ६९६ एकूण क्षेत्र २७ आर. व गट नं. ६९६ च्या उत्तरेस गायरान गट नं. ६ या दोन्ही मिळकतीची पाहणी करुन त्याप्रमाणे नकाशा व वस्तुस्थितीचा अहवाल या न्यायालयाकडे पुढील नेमले तारेखपर्यंत सादर करावा.

०३. दरखास्तदार यांनी कोर्ट कमिशनर यांचे शुल्क रु.५,०००/– न्यायालयात भरावे

०४. दरखास्तदार यांनी कोर्टकमिशनर यांना संबंधीत मिळकतीचे आवश्यक ते कागदपत्र पुरवावीत. तसेच दोन्ही पक्षकारांनी कमिशनचे काम सुरळीत होण्याकरीता कमिशनर यांना योग्य ते सहकार्य करावे.

०५. कोर्ट कमिशनर यांनी प्रत्यक्षात जागेवर जाणेपूर्वी दोन्ही पक्षकार व त्यांच्या विधिज्ञांना नोटीसा देऊन अवगत करावे.

Digitally signed by V. A. Lavand-Kokate
Date: 2024.06.18 15:25:00 +0530

V. A. Lavand-Kokate

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

कळे–खेरीवडे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर,

दि. १०/०५/२०२३. कळे–खेरीवडे.